बंदीच बरी!

हे 'बीबीसी' प्रकरण एकदा का 'योग्य' प्रकारे हाताळले गेले की त्याचा संदेश अन्यांपर्यंत लगेच पोहोचेल आणि माध्यमे त्यातून योग्य तो धडा घेतील, याची गरजच आहे...

जगातील सर्वात भव्य, सर्वात बलाढ्य, सर्वात लोकप्रिय, सर्वात प्राचीन लोकशाही देशातील सर्वात मोठ्या पक्षाने 'ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशन' म्हणजे 'बीबीसी'चे वर्णन जगातील सर्वात भ्रष्ट वृत्तसेवा केले ते सर्वात योग्य असे आताशा आमचे मत आहे. यामागील कारण ही वृत्तसेवा केवळ साहेबाच्या देशातील आहे हे नाही. तसे पाहू गेल्यास जे जे साहेबाचे ते ते त्याज्यावे असेच आम्ही मानतो. उदाहरणार्थ लोकशाही. खरे पाहू गेल्यास ती भारतातून साहेबाच्या देशात आधी गेली आणि नंतर ती तेथून परत भारतात आली. जसे की योग. पूर्वीच्या आरोग्यदायी भारतात जेवून पोटास तड लागल्यावर घरच्या घरी केला जाणारा पवनमुक्तासनादी आसनयोग साहेबाच्या देशात गेला आणि भारतात योगा होऊन परत आला. लोकशाहीचेही असेच झाले. या विशाल, प्राचीन वगैरे देशातील जनकल्याणकारी संस्थानांत लोकशाही आधीपासूनच नांदत होती. ईस्ट इंडिया कंपनी भारतात आली त्याच्या किती तरी आधी या देशातील गुर्जर बांधव फाफडा, ढोकळा इत्यादींच्या व्यापारासाठी साहेबाच्या देशात गेले आणि तमसा तीरी दुकान थाटून बसले होती याची कागदोपत्री नोंद आमच्याकडे आहे. (तिचा लवकरच इतिहासात समावेश करण्याचे आदेश देण्यात आले असून तसा आवश्यक तो बदल होईल.) तमसा तीरावरील या गुर्जर व्यापारी मंडळींच्या एकमेकांतील सौहार्दपूर्ण शंखस्वरांतील लोकशाहीयुक्त संभाषणामुळे साहेबास लोकशाही समजली. म्हणून लोकशाहीचे वर्णन 'नॉइझी सिस्टीम' असे केले जाते. भारतीय खाद्यपदार्थ सेवनामुळे साहेबाची पोटे बिघडू लागल्यामुळे आपले मसाले हुडकण्यासाठी साहेबाची पलटण भारतात आली आणि मसाले घेऊन मायदेशी परतली. भारतात असताना त्यांनी तमसा तीरावर खाद्यपदार्थ विकणाऱ्या भारतीयांतील लोकशाहीयुक्त संबंधांचे खूपच कौतुक केले. त्यामुळे साहेबानीच भारतात लोकशाही आणली असा काहींचा समज झाला. जे जे पाश्चात्त्य ते ते पवित्र असे मानण्याच्या पं. नेहरू आणि तत्समांच्या गाफीलपणामुळे साहेबास लोकशाही आणल्याचे श्रेय दिले जाते. ते चुकीचे आहे. म्हणून साहेबी लोकशाही प्रारूपाचा आपण त्याग करून खाविंदचरणारविंदी मिलिंदायमान अशा भारतीय लोकशाही पद्धतीचे आचरण करायला हवे.

तसे केल्यास बीबीसीसारख्या भ्रष्ट यंत्रणांची काही गरजच राहणार नाही. तसेच व्हायला हवे. वृत्तमाध्यमांची मुळात गरजच काय? अंगभूत अशक्तपणामुळे क्षत्रिय कुलीन संरक्षण क्षेत्र न पेलणारे, अंकगणितात गती नसल्याने व्यापारउदिमात मागे पडणारे, कृश शरीरयष्टीमुळे ताकदीची कामे न झेपणारे इत्यादी बैठकबहादरांच्या उदरनिर्वाहाची सोय व्हावी म्हणून साहेबाने पत्रकारिता व्यवसाय जन्मास घातला. लोकशाहीप्रमाणे आपण तो स्वीकारण्याचे अजिबात कारण नाही. पूर्वीच्या महान भारतातील लोकशाहीत राजा त्यास हवी ती माहिती दवंडी पिटवून आपल्या नागरिकांपर्यंत पोहोचवत असे. कालौघात तंत्रज्ञान विकसित झाल्याने ही दवंडी हातातील मोबाइल फोन नामक यंत्रातील विविध समाजमाध्यमांवर पिटता येतेच. लोकशाहीचा अत्यानंद घेणारे नागरिक एकमेकांच्या मोबाइलद्वारे ही माहिती फॉरवर्ड करून आपले कर्तव्य पार पाडता पाडता संज्ञापनाचा आनंदही लुटू शकतात. अशा तऱ्हेने राजास हवे ते हव्या तितक्यांपर्यंत हव्या तितक्या जलदगतीने पोहोचवता येते. तेव्हा ही सोय असताना माहिती वहनासाठी अन्य माध्यमांची गरजच काय? राजाचे म्हणणे समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचवण्याची सोय असतानाही या बैठकबहादरांच्या हातास काम आणि पोटास चार घास मिळावेत या हेतूने पत्रकारिता क्षेत्राचा उदय झाला. भारतासारख्या अतिप्राचीन सुसंस्कृत देशात आता त्याची गरज उरलेली नाही. आपल्या संस्कृतीत राजा हा परमेश्वराचा अवतार असतो. परमेश्वराचे ऐकायचे असते. त्यास काही विचारायचे नसते. म्हणून राजासही काही विचारायचे नसते. म्हणून माहितीचा प्रवास राजा ते प्रजा असा आणि इतपत हवा. प्रजा ते राजा अशा मार्गाची गरज नाही. तेव्हा हे एक-दिशा माहिती वहन सहज-सुलभपणे होत असताना आणि मुख्य म्हणजे नागरिकांस अशा दुपदरी माहिती-वहनाची गरज नसताना माध्यमांच्या अस्तित्वाचे प्रयोजनच नाहीसे होते.

माध्यमांस आवरले की सर्व काही सुरळीत होते, हे आपल्या देशातील ऐतिहासिक 'अनुशासन पर्वा'ने दाखवून दिलेच. आता नागरिकांस दुपदरी माहिती-वहनाची गरज नसताना माध्यमांच्या अस्तित्वाचे प्रयोजनच नाहीसे होते...

कोण कुठली साहेबाच्या भ्रष्ट पैशावर भ्रष्ट मार्गाने पोसली गेलेली आणि म्हणून स्वतः भ्रष्ट झालेली बीबीसी, तिची पत्रास ठेवण्याचे कारणच काय? बीबीसी पत्रकारितेत निष्पक्ष आणि स्वायत्त असल्याचा दावा केला जातो. तो खरा असेल वा नसेल. पण ही निष्पक्षता आणि स्वायत्तता हीच तर खरी समस्या आहे. निष्पक्ष माध्यमे जनतेच्या मनात व्यवस्थेविषयी संभ्रम निर्माण करतात. गैरसमज निर्माण करू शकतात. त्यामुळे ही निष्पक्षता हा गुण खचितच नाही. असे करणाऱ्यास स्वायत्तता देणे हे तर आणखीनच पाप. त्या पापाचा हिशेब प्राप्तिकर खात्याच्या 'कर'वाई मुळे होईल. म्हणून सर्वांनी बीबीसीवरील या 'कर'वाईचे उघडपणे समर्थन करायला हवे. बीबीसी भारतात येणार. भारतीयांना नको असलेल्या बातम्या देणार. त्याद्वारे पैसे कमावणार. तेव्हा त्या पैशाच्या हिशेबवह्या तपासणीसाठी आपले अधिकारी गेले बीबीसीच्या कार्यालयात तर त्यात इतका गहजब करण्याचे कारणच काय? असे केले म्हणून गहजब करणारे, गळा काढणारे सर्वजण पाश्चात्त्यवादी ठरतात. बहुतांशी देशी नागरिकांना या परदेशी वृत्तवाहिनीवरील कारवाईचे काही इतके वाटत नसेल तर माध्यमांनी तरी या कारवाईची दखल का घ्यावी? माध्यमांनी नेहमी बहुमताच्या बाजूने असायला हवे. 'बीबीसी'वरील कारवाईने मूठभरांस दुःख होत असेल तर या मूठभरांची पत्रास ठेवण्याचे काहीही कारण नाही. हे झाले 'बीबीसी'बाबत.

हे प्रकरण एकदा का 'योग्य' प्रकारे हाताळले गेले की त्याचा संदेश अन्यांपर्यंत लगेच पोहोचेल आणि माध्यमे त्यातून योग्य तो धडा घेतील. या अशा धड्याची फार गरज आहे. त्या अभावी माध्यमे फार मोकाट सुटण्याची शक्यता होती. माध्यमे मोकाट सुटणे म्हणजे अनागोंदीस निमंत्रण. माध्यमांस आवरले की सर्व काही सुरळीत होते. कसे ते आपल्या देशातील ऐतिहासिक 'अनुशासन पर्व' या एका उदाहरणाने दिसलेले आहेच. ते उदाहरण घालून दिल्याबद्दल आपण सर्वांनी इंदिरा गांधी यांचे ऋणी राहायला हवे. पं. नेहरू यांची सुकन्या असूनही पाश्चात्त्यांची मुक्त माध्यमांची थेरे अजिबात चालवून न घेण्याचा शहाणपणा त्यांनी दाखवला. त्यामुळे त्या वडिलांपेक्षाही श्रेष्ठ ठरतात. त्यांच्या 'अनुशासन पर्वात' सर्व काही सुतासारखे होते. सरकारी कर्मचारी (आपल्याच) कार्यालयात वेळेवर येत, लोकल वेळेवर धावत, नागरिक सर्व नियमांचे पालन करत इत्यादी. सांप्रति देश महासत्ता होऊ पाहत असताना पुन्हा एकदा अशाच अनुशासन पर्वाची गरज आहे. माध्यमे - त्यातही 'बीबीसी'सारखी स्वतःस स्वतंत्र म्हणवणारी - ही या अनुशासन पर्वाच्या मार्गातील मोठी अडचण. व्यापक देशहितासाठी ही अडचण दूर केली जात असेल त्याचे कौतुकच व्हायला हवे. पाश्चात्त्यांना भारताची प्रगती पाहवत नाही. असूया... दुसरे काय! बीबीसीसारख्या वाहिन्या आणि माध्यमे त्यामुळे भारताविरोधात सतत प्रचार करीत असतात. या कारवाईमुळे आता तरी त्यांस भारताच्या सामर्थ्याची जाणीव होईल. आज बीबीसी झाली, की त्यामुळे उद्या सीएनएन, 'एनवायटी', 'वॉश्पो', 'द इकॉनॉमिस्ट', 'एफटी', 'गार्डियन' इत्यादी भारतद्वेष्टे आपोआप जमिनीवर येतील. त्यासाठी बीबीसीवर केवळ प्राप्तिकराची सर्वेक्षणवजा 'कर'वाई नको, बंदीच बरी!

पंचायतींकडे जमिनींचे ऑडिट हवेच!

पूजा चंद्रन, सुब्रत सिंह

IDEAS FOR INDIA
for more evidence-based policy

भूमाफियांपासून रक्षण हाच नव्हे, तर गावाच्या विकासाचाही उद्देश त्यातून साध्य होऊ शकतो...

भारताच्या एकूण क्षेत्रफळापैकी एकचतुर्थांश हिस्सा सार्वजनिक संसाधनांचा आहे. त्यात सामुदायिक जंगले आहेत, गायराने, कुरणे आहेत. ग्रामीण भारतातील ३५ कोटी गरिबांची उपजीविका या संसाधनांवर अवलंबून आहे. भारतीय राज्यघटनेने यांची मालकी आणि संरक्षणाचे हक्क ग्रामपंचायतींना दिले आहेत. मात्र, त्याची त्यांना ना माहिती आहे ना त्यासाठीचे कौशल्य. या सार्वजनिक मत्तांचे संरक्षण करण्यासाठी सामुदायिक जमिनींचे ऑडिट हाच अत्यावश्यक उपाय ठरू शकतो.

महाराष्ट्रात 'गायरान', राजस्थानात 'शामलात', ओडिशात 'सर्बसाधारण', तमिळनाडूत 'पोरम्पोक्कू' या नावांनी गावाच्या मालकीच्या सामुदायिक जमिनी अस्तित्वात आहेत. त्यांच्यावरील संसाधनांचा संपूर्ण गावे एकत्रित वापर करतात. देशातील एकूण जमिनीपैकी एकचतुर्थांश जमिनी सामुदायिक मालकीच्या आहेत. ग्रामीण भारतातील ३५ कोटी गरिबांची उपजीविका या सामायिक संसाधनांवर अवलंबून आहे. त्यांचा चारा, इंधन, वनोपज, मासे, बांबू असे कित्येक घटक याच सामुदायिक मालमत्तेतून येतात. तरीही त्यांची प्रचंड वाताहत झाली आहे. खासगी मालमत्तांसारख्या यांच्या सीमा निश्चित झालेल्या नाहीत. अनेक ठिकाणी मालकी हक्कांचे तंटे सुरू आहेत. त्यावर पिढ्यान्पिढ्या गुजराण करणाऱ्या समुदायांच्या हक्कांचे, वहिवाटीचे कागदोपत्री दस्त केलेले नाहीत. या ठिकाणी वैयक्तिक मालकीसाठी खासगी अतिक्रमण झाले आहे किंवा त्यावर अवलंबून असलेले समुदाय अन्य वा अधिक उत्पादक साधनांकडे वळल्याने त्यांचे रूप बदलले आहे.

सामायिक मत्तांचे संरक्षण

स्वातंत्र्यानंतर देशातील जमिनींच्या फेरवाटपात नागरिकांना खासगी जमिनींचे हक्क मिळाले आणि सामुदायिक जमिनी राज्य सरकारच्या अखत्यारीत आणल्या गेल्या, पण त्यातील बराचसा भाग 'वरकड' वा 'ओसाड' जमीन म्हणून नोंदला गेला आहे. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ३९ (ब) नुसार ''सामूहिक हिताला सर्वाधिक उपकारक होईल अशा रीतीने समाजाच्या भौतिक साधनसंपत्तीचे स्वामित्व व नियंत्रण यांची विभागणी व्हावी''. मात्र, त्याचे पालन किंवा न्याय्य वापर हा देशाच्या कल्याणकारी चौकटीतून आखण्यात आलेल्या धोरणांवर अवलंबून आहे. त्यासाठी मुळात, राज्याची भूमिका या मत्तेचे रक्षण करणाऱ्या विश्वस्ताची आहे, मालकाची नाही. जगताप सिंग आणि इतर विरुद्ध पंजाब राज्य आणि इतर (२०११) यांसारख्या महत्त्वाच्या न्यायालयीन निकालांनी, सामुदायिक मालमत्तेवरील सामुदायिक हक्क अधोरेखित केले आहेत.

साधारणपणे या जमिनींचे व्यवस्थापन राज्यांच्या महसूल आणि वन विभागांकडे आहे. अर्थात, ७३ व्या घटनादुरुस्तीनंतर ग्रामपंचायतींकडे गावाच्या सामायिक जमिनींचे व्यवस्थापन व संरक्षणाचे हक्क आले. या जमिनींचे संवर्धन, तेथील जल व्यवस्थापन, सामाजिक कल्याण व सामुदायिक मालमत्तांचे व्यवस्थापन पंचायत राज संस्थांकडे आले. मात्र, त्यासाठी पंचायत संस्थांना आवश्यक कौशल्य, साधने आणि सहयोग मात्र मिळाला नाही.

'मत्ता नोंदवही' म्हणजे काय?

ही पंचायत संस्थांच्या ताब्यातील सामुदायिक मालमत्तांची यादी आहे. पंचायत संस्थांना त्यांच्या ताब्यातील मालमत्तांची माहिती व्हावी, त्याची सद्यःस्थिती, मूल्यांकन माहीत असावे हा याचा उद्देश. या रजिस्टरमुळे ग्रामपंचायतींना त्यांच्या मालमत्तांचा शोध घेणे, त्यांचे नुकसान वा चोऱ्या रोखणे, त्यांचे संवर्धन करणे हे अंकेक्षणाच्या - म्हणजेच ऑडिटच्या माध्यमातून शक्य आहे. ही मत्ता नोंदवही कारभारात पारदर्शकता आणणे, भ्रष्टाचाराचा धोका कमी करणे आणि राजकीय उत्तरदायित्वाचा पाया रचणे यांसाठी अत्यंत प्रभावी साधन ठरू शकते. अर्थात, ती तयार करतानाच किमान पातळीवरील देखभालीचा विचार करावा लागतो. जमिनीचा दुरुपयोग रोखण्यासाठी प्रत्यक्ष स्थळांचे सामाजिक अंकेक्षण किंवा सोशल ऑडिट गरजेचे असते.

दुहेरी शोकांतिका

मत्ता नोंदवहीची जबाबदारी ग्रामपंचायतीची असते. मात्र, त्यासाठी ग्रापमंचायती सक्षम आहेत असे गृहीत धरले गेले. प्रत्यक्षात त्यांना याबाबतची ना माहिती आहे ना हे कसे करावे याचे ज्ञान. ही नोंदवही कशी असावी याची रचना राज्यांनी तयार केली असली तरी ती भरण्याची प्रक्रिया, त्याचा पाठपुरावा व नियंत्रण व्यवस्थित केले जात नाही. बहुतांश ठिकाणी पंचायती त्यांच्या मालकीच्या इमारती, कार्यालये या मालमत्तांची एक यादी तयार करून ठेवतात, मात्र त्यांनी व्यवस्थापन करण्याच्या जमिनी, पाणी, जंगल यांच्या नोंदी ठेवण्यात पंचायती अपयशी दिसतात.

भारतातील समूह संघटित नाहीत आणि पायाभूत साधनांसाठी सामूहिक कृती करीत नाहीत एवढीच शोकांतिका नाही, तर सामुदायिक मालमत्तेच्या रक्षणाची जबाबदारी ज्यांच्याकडे आहे त्या पंचायतींच्या पातळीवर याचा तपशीलच उपलब्ध नाही ही आहे. महसूल आणि वन विभागाच्या कामाची गुंतागुंतीची प्रक्रिया, पंचायतींच्या कामाची पद्धत, त्यांचे हितसंबंध, सुसूत्रतेचा अभाव, सामुदायिक मालमत्तांच्या आकडेवारीची वानवा यामुळे या सामुदायिक मालमत्तांचे व्यवस्थापन जिकिरीचे होते. गावच्या पारंपरिक वहिवाटींचा आपल्या आधुनिक नोंदींमध्ये समावेश करण्यात आलेला नाही. सहज सोप्या आणि खुल्या पद्धतीने डेटा नोंदणी व उपलब्धता प्रशासकीय कारभारासाठी गरजेची आहे. गायरान, वन जमीन किवा शेतीपूरक/शेतीबाह्य वापरासाठी विकसित होऊ शकणारी जमीन याच्या नोंदी झाल्या, तसेच 'मनरेगा'द्वारे निर्माण झालेल्या गावच्या मत्ताही यात आल्या, तर विकास अधिक सुकर होईल.

'लँड ऑडिट' हा उपाय

ग्रामपंचायतींना त्यांच्या सामुदायिक मालमत्तांची माहिती उपलब्ध करून देणे एवढेच पुरेसे नसून, पंचायतीच्या मालमत्तांचे नियमित लँड ऑडिट आणि सोशल ऑडिट, मत्ता नोंदवहीचा काटेकोर वापर हे खरे उपाय ठरतील. हल्ली महापालिका क्षेत्रांतील सामायिक मालमत्तांचे ऑडिट आणि व्यवस्थापन नियमित सुरू झाले आहे. किंबहुना, 'कॅग'नेदेखील २०१४ च्या दिल्ली विकास प्राधिकरणाच्या मालकीच्या मालमत्तांचे 'परफॉर्मन्स ऑडिट' केले होते. मैसूर नागरी विकास प्राधिकरणाने त्यांच्या मालमत्तांवरील अतिक्रमणे निश्चित करण्यासाठी आणि त्यांच्या मालकीच्या जमिनींवर पुन्हा ताबा मिळवण्यासाठी २०२२ मध्ये 'लँड ऑडिट' केले. पंजाब सरकारने २०१७ मध्ये त्यांच्या १२,५०० ग्रामपंचायतींच्या क्षेत्रात लँड ऑडिट करून ग्रामपंचायतींचे उत्पन्न वाढवण्याचे अभियान चालवले होते. या उदाहरणांवरून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालकींच्या सामुदायिक मालमत्तांच्या व्यवस्थापनासाठी त्यांचे लँड ऑडिट किती गरजेचे आहे हे स्पष्ट होते. ग्रामीण भागातील अनेकांची उपजीविका यावर अवलंबून असल्याने त्याचे नियमित व्यवस्थापन खूपच गरजेचे आहे. ऑडिटमुळे सामुदायिक जमिनींवरील अतिक्रमण हटवण्यासाठीच नव्हे तर प्रशासकीय कारभार प्रभावी होण्यासाठी मदत होते. सोबतच या मत्तांची देखभाल/ दुरुस्ती, या साधनांचा गावाच्या विकासासाठी अधिकाधिक उपयोग करून घेणे यातील गुंतवणुकीसाठी ऑडिट आवश्यक आहे.

'कॅग'ने २०२१ च्या नोव्हेंबरमध्ये पंचायत राज संस्थांच्या आर्थिक परीक्षणात 'सामायिक मालमत्ता नोंदवही'बाबत मार्गदर्शक सूचना केल्या आहेत. जिओटॅगिंग, छायाचित्रे यांच्या मदतीने कॅगने या मालमत्तांचे परीक्षण सुरू केले आहे. मत्ता नोंदवहीत नमूद केलेला मत्तांचा भाव, त्यावरील अतिक्रमणाच्या नोंदी, विविध योजनांद्वारे त्यांच्यावर करण्यात आलेली कामे याचे परीक्षण केले जाते. हे अत्यंत उपयुक्त पाऊल असले तरी गावांच्या मालकीच्या या सामुदायिक जमिनींच्या चतुःसीमांची आखणी, दस्तनोंदणीची प्रभावी व्यवस्था, जमिनींवरील अतिक्रमणे, गैरवापराच्या नोंदी व त्याविरोधात करण्यात आलेल्या कायदेशीर कार्यवाही, त्यांचे नियोजन व नियमन यासाठी कार्यक्षम व्यवस्था, संरक्षणासाठीच्या परिणामकारक व परवडणाऱ्या उपाययोजना यांचाही अंकेक्षणात समावेश करणे गरजेचे आहे. गावाच्या सामुदायिक मालमत्तांचे आपण विश्वस्त आहोत याचे भान ग्रामपंचायतींना येईल, या मालमत्ता नोंदवहीचे नियमित व्यवस्थापन होईल, त्याचे नियमित परीक्षण होईल आणि सामुदायिक मालकीच्या जमिनीवरील अतिक्रमणांचे निर्मूलन होईल, तेव्हाच संसाधनांचे उचित व्यवस्थापन होऊ शकेल.

('ideasforindia.in' या संकेतस्थळाच्या साह्याने 'लोकसत्ता'साठी करण्यात आलेला स्वैर अनुवाद. लेखकद्वयापैकी पूजा चंद्रन या फाउंडेशन ऑफ इकॉलॉजिकल सिक्युरिटी येथे विधि संशोधक म्हणून कार्यरत आहेत, तर सुब्रत सिंह हे तेथे संचालक आहेत.)

अन्वयार्थ

बाजारपेठेचा महिमा

एअरबस आणि बोइंग या जगातील दोन अग्रणी प्रवासी विमान उत्पादक कंपन्यांकडून अनुक्रमे २५० आणि २२० अशी एकूण ४७० विमाने खरेदी करण्याची घोषणा एअर इंडियाने केली आहे. या व्यापारी स्वरूपाच्या घडामोडीची विजयी वर्दी देण्याची गरज पंतप्रधान नरेंद्र मोदी, फ्रान्सचे अध्यक्ष इमान्युएल माक्रॉं आणि अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांनाही वाटावी यातून या दुहेरी व्यवहाराचे महत्त्व विशद होते. केवळ विमानेच नव्हे, तर या विमानांसाठी लागणारी इंजिने खरेदी करण्याबाबत एका व्यवहाराची दखल ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांनी घेतली आहे. एकाच दिवशी एखाद्या विमान कंपनीने ४००हून अधिक विमाने खरेदी करण्यावर शिक्कामोर्तब करण्याची प्रवासी विमान वाहतूक क्षेत्राच्या इतिहासातील ही बहुधा पहिलीच वेळ. विमान आणि संबंधित उपकरणांच्या खरेदीची दखल अमेरिका, फ्रान्स आणि ब्रिटनच्या राष्ट्रप्रमुखांनी घेऊन, प्राधान्याने विकसनशील अशा भारतासारख्या खरेदीदार देशाशी दृढसंबंधांची कृतार्थभावाने उजळणी करण्याचा प्रकारही किंबहुना तितकाच दुर्मीळ.

सध्याच्या मंदीसदृश काळात बाजारपेठा आणि ग्राहक मिळवणे अतिशय आव्हानात्मक झाले आहे. कोविड महासाथ आणि पाठोपाठ उद्भवलेले युक्रेन युद्ध हे दोन तीव्र धक्के पचवून उभे राहण्यास जगभरातील प्रमुख अर्थव्यवस्था अपेक्षेपेक्षा अधिक वेळ घेत आहेत. याचे प्रमुख कारण म्हणजे बाजारपेठाच सुस्त-स्तब्ध आहेत. बाजारपेठांमध्ये धुगधुगी येत नाही कारण मालाला मागणी नाही, ग्राहकांची क्रयशक्ती गोठलेली आहे. त्यामुळे व्यापार आणि उत्पादनाचे प्रयोजन राहात नाही. म्हणून रोजगाराला चालना मिळत नाही. यातून रोडावलेल्या उत्पन्नामुळे खरेदीस प्रोत्साहन नाही. हे दुष्टचक्र भेदण्याचा प्रयत्न जगभरातील अर्थव्यवस्था करत आहेत. अशा कातर वातावरणात भारताने एकदम पावणेपाचशे विमानांची 'ऑर्डर' जाहीर करणे, हे या उत्पादक व निर्यातदारांसाठी हर्षोल्हासमूलकच! एअर इंडियाची मालकी टाटा समूहाकडे जाणे हा या कंपनीच्या वाटचालीतील मैलाचा दगड ठरला होता. आता टाटांच्या आधिपत्याखाली या कंपनीने विक्रमी खरेदी व्यवहाराची नोंद केली, हे नक्कीच कौतुकास्पद आहे. 'जागतिक मंदीसदृश झाकोळातील तेजोबिंदू' असे भारताचे वर्णन विद्यमान सरकार आणि आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था करत आहेत. हा दावा अनाठायी नसल्याची प्रचीती ताज्या व्यवहारातून येऊ शकते. परंतु जगातील सर्वाधिक निसरड्या क्षेत्रांपैकी एक अशी प्रवासी हवाई विमान वाहतूक क्षेत्राची अपकीर्ती. त्यामुळे एअर इंडियाच्या या खरेदी व्यवहाराची अधिक सखोल चिकित्सा यथोचित ठरेल.

या ४७० विमानांच्या खरेदीसाठी प्रचंड प्रमाणात कर्जउभारणी करावी लागेल, ज्यात अर्थातच जोखीम आहे. ही विमाने येत्या पाच ते सात वर्षांत टप्प्याटप्प्याने दाखल होत आहेत. यातील सगळीच विमाने एअर इंडियाच्या ताफ्यात न राहता, यातील काही भाडेपट्टीने देऊन त्यातून उत्पन्न मिळवण्याचा एक मार्ग आहे. आजवर इतक्या मोठ्या प्रमाणात विमानांची मागणी नोंदवण्याची परंपरा आखाती देशातील श्रीमंत विमान कंपन्यांची होती. परंतु विमानांच्या बरोबरीने विशेषतः संयुक्त अरब अमिराती (दुबई) आणि कतार (दोहा) या दोन्ही देशांनी त्यांच्या देशातील विमानतळ जागतिक हवाई वाहतूक केंद्रे (ग्लोबल हब) म्हणून प्रयत्नपूर्वक विकसित केली. याचा मोठा फायदा दोन्ही देशांना झाला. भारतात विशेषतः स्थानिक बाजारपेठेत आणखी ४०० विमाने यावयाची असल्यास त्याच्याशी सुसंगत असा पायाभूत सुविधांचा विकासही व्हावा लागेल. मोजक्याच कंपन्यांना कोणत्याही अनुभवाच्या शिदोरीविना नवथर विमानतळांची कंत्राटे बहाल करणे हा यासाठीचा मार्ग खचितच नव्हे!

भारतात किमान पाच स्थानिक कंपन्या कार्यरत आहेत. यातील इंडिगो कंपनीकडे एअर इंडियापेक्षा अधिक बाजारहिस्सा आहे. त्याचबरोबर, परदेशात भारतीयांची ने-आण करण्यासाठी सध्या एमिरेट्स, कतार एअरवेज, लुफ्तान्सा, सिंगापूर एअरलाइन्स या विमान कंपन्यांची तीव्र स्पर्धा आहे. ही स्पर्धा सांभाळत नवीन खरेदीला न्याय देणे ही कसरत टाटांना करावी लागेल. विमान वाहतूक वाढणार, तशी देखभाल-दुरुस्तीची निकडही वाढणार. या एका आघाडीवर आपण प्रगत व विकसित देशांच्या किती तरी मागे आहोत. एअरबस आणि बोइंग कंपन्यांना त्या दृष्टीने येथे आमंत्रित करण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. मोदी, बायडेन, माक्रॉं, सुनाक असे सगळेच आज आनंदात असले, तरी तूर्त यातील तिघांच्याच झोळीत या व्यवहारांमुळे नजीकच्या काळात छनछनाट संभवतो. याचे भान चौथ्या नेत्यास आणि त्याच्या समर्थकांस असेलच! बाजाराचा महिमा मोठा असला, तरी यात ग्राहकापेक्षा व्यापाऱ्याचाच फायदा नेहमी अधिक होतो. तेव्हा सदा ग्राहकच राहायचे, की केव्हा तरी व्यापारी-उत्पादक व्हायचे, हे आपण ठरवायचे आहे.

विश्लेषण

महेश सरलष्कर

जम्मू-काश्मीरमध्ये 'राजकीय फेररचने'चा प्रयत्न?

सर्वोच्च न्यायालयाने जम्मू-काश्मीरमधील लोकसभा-विधानसभा मतदारसंघांच्या फेररचनेला सोमवारी वैध ठरवले आहे. पण अनुच्छेद ३७० रद्द करून विशेषाधिकार काढून घेण्याच्या केंद्राच्या निर्णयाला दिलेल्या आव्हानावर खटला चालवला जाणार आहे. खरे तर आव्हान याचिकेतील प्रमुख मुद्दा विशेषाधिकाराशी निगडित होता. अनुच्छेद ३७० चे मूळ प्रकरण न्यायालयात प्रलंबित असताना केंद्राने मतदारसंघांच्या फेररचनेचा खटाटोप कशासाठी केला, असा याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद होता. २०२६ नंतर होणाऱ्या पहिल्या देशव्यापी जनगणनेपर्यंत मतदारसंघांच्या फेररचनेला स्थगिती दिली असताना फक्त जम्मू-काश्मीरमध्ये ही प्रक्रिया का केली गेली, असाही प्रश्न विचारला गेला. तत्कालीन मुख्यमंत्री फारूक अब्दुल्ला यांनी जम्मू-काश्मीरमध्येही २०२६पर्यंत मतदारसंघांच्या फेररचनेला स्थगिती दिली होती. देशभरात ही प्रक्रिया होईल तेव्हा जम्मू-काश्मीरमध्येही करा, तसे नसेल तर केंद्र सरकारचा आत्ता विशेष आयोग नेमून ही प्रक्रिया पूर्ण करण्यामागील हेतू भाजपला राजकीय लाभ मिळवून देण्याचा असू शकतो, असा याचिकाकर्त्यांचा दावा होता. त्यावर, इथल्या अनुसूचित जमातींवर अन्याय झाला असून मतदारसंघांच्या फेररचनेमुळे त्यांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळेल, असा राजकीय युक्तिवाद भाजपने केला आहे. मात्र, फेररचना झाल्यानंतर लोकसंख्येच्या प्रमाणात लोकप्रतिनिधित्वाचे वेगळेच चित्र निर्माण होऊ शकेल! जम्मू विभागातील विधानसभा मतदारसंघ ३७ वरून ४३; तर काश्मीर खोऱ्यात एका मतदारसंघाची वाढ होऊन ते ४७ होणार आहेत.

फेरबदलांमुळे काय होईल?

अनंतनाग व जम्मू लोकसभा मतदारसंघांच्या सीमांमध्ये बदल झाला आहे. पूंछ व राजौरी जिल्ह्यांचा समावेश असलेला तसेच, पूर्वी जम्मू लोकसभा मतदारसंघाचा भाग असलेला जम्मूचा पीर पंजाल प्रदेश आता काश्मीरमधील अनंतनाग लोकसभा मतदारसंघात समाविष्ट केला आहे. श्रीनगर लोकसभा मतदारसंघातील शियाबहुल प्रदेश बारामुल्ला मतदारसंघाला जोडण्यात आला आहे. विधानसभेत काश्मिरी स्थलांतरित (काश्मिरी हिंदू) समुदायातील किमान दोन सदस्यांची तरतूद केली आहे. फाळणीनंतर जम्मूमध्ये स्थलांतरित झालेल्या पाकव्याप्त काश्मीरमधील विस्थापितांनाही विधानसभेत प्रतिनिधित्व देण्याची शिफारसही असून दोन्हींचा भाजपला राजकीय लाभ मिळेल. २०११ च्या जनगणनेच्या आधारावर मतदारसंघांची फेररचना झाली आहे. त्यामुळे या बदलांचा अर्थ असा आहे की, ४४ टक्के लोकसंख्या (जम्मू) ४८ टक्के मतदारसंघांमध्ये मतदान करतील. तर, काश्मीर खोऱ्यातील ५६ टक्के उर्वरित ५२ टक्के जागांवर मतदान करतील. पूर्वीच्या रचनेत काश्मीरच्या ५६ टक्के लोकांकडे ५५.४ टक्के जागा होत्या आणि जम्मूच्या ४३.८ टक्के जागा ४४.५ टक्क्यांकडे होत्या. काश्मिरी खोऱ्यातील जनतेचे प्रतिनिधित्व नव्या रचनेत कमी होऊन जम्मूतील हिंदूबहुलांचे प्रतिनिधित्व वाढेल! जम्मूमधील सहा नव्या मतदारसंघांपैकी चारमध्ये प्रामुख्याने हिंदू आहेत. दोडा आणि किश्तवाड जिल्ह्यांमधील चिनाब प्रदेशातील दोन नव्या मतदारसंघांमध्ये मुस्लीम अल्पसंख्याक आहेत. नवा कुपवाडा मतदारसंघ 'पीपल्स कॉन्फरन्स'चा बालेकिल्ला असून हा पक्ष भाजपच्या गटातील मानला जातो. बारामुल्ला लोकसभा मतदारसंघाच्या फेररचनेमुळे शिया मतांचे एकत्रीकरण होईल. साजद लोन यांच्या 'पीपल्स कॉन्फरन्स'मधील शिया नेत्यांना त्याचा लाभ मिळेल.

अनुसूचित जमातींसाठी राखीव मतदारसंघांमुळे कोणता फरक पडेल?

विधानसभेच्या नऊ जागा अनुसूचित जमातींसाठी राखीव असून यापैकी सहा मतदारसंघ अनंतनाग लोकसभा मतदारसंघात आहेत. त्यातही अनुसूचित जमातींची सर्वाधिक लोकसंख्या पूंछ व राजौरीमध्ये आहे. पूर्वीच्या अनंतनाग लोकसभा मतदारसंघामध्ये अनुसूचित जमातीची लोकसंख्या कमी होती. नव्या रचनेत अनंतनाग लोकसभा मतदारसंघाचा निकाल पूंछ व राजौरी ठरवेल. त्यामुळे तेथील काश्मिरी मुस्लीम मतदारांचा प्रभाव कमी होणार आहे. पूंछ आणि राजौरी हे जम्मू लोकसभा मतदारसंघाचे भाग झाले असते तर हा लोकसभा मतदारसंघ राखीव ठेवावा लागला असता. पण, ते अनंतनागशी जोडण्यात आले आहेत. याचा जम्मू व अनंतनागमध्ये भाजपला लाभ मिळू शकतो.

३७० विरोधातील याचिकेचे काय होणार?

फेररचनेसह अनुच्छेद ३७०ला विरोध करणारी याचिकाही सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने मतदारसंघांच्या फेररचनेला विरोध करणारी याचिका फेटाळली असली तरी, अनुच्छेद ३७०ला विरोध करणाऱ्या याचिकेवर स्वतंत्र सुनावणी घेतली जाणार आहे.

mahesh.sarlashkar@expressindia.com